सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/2419
दिनांक :- 03 SEP 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- ओव्हल मैदान तसेच महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये तसेच अन्यत्र खेळ खेळण्यास येणा-या महिला खेळाडूकरीता सुलभ शौचालयाची उपलब्धता करुन देणेकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत.**

**संदर्भः-** १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. सकीर्ण-२०२५/प्र.क्र.८८(१७३/२५) समन्वय, दिनांक २०/८/२०२५.
२. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/सं.क्र.१०१/नवि-३४ दिनांक १/८/२०२५.
३. संचालनालयाचा DESK १६ दिनांक २१/०८/२०२५ चा ई मेल.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या परिपत्रकासोबत जोडलेल्या पत्रांचे अवलोकन करावे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ओव्हल मैदान तसेच महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये तसेच अन्यत्र खेळ खेळण्यास येणा-या महिला खेडाडूकरीता सुलभ-शौचालयाची उपलब्धता करुन देणेंकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत मा. लोक आयुक्त यांनी स्वाधीकारे सुरु केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या विशेष पथकांची बैठक दिनांक २० जून २०२५ रोजी पार पडली.

सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये राज्यातील सर्व मैदान व क्रिडांगण येथे महिलांकरिता अत्याधिक स्वच्छतागृहे तयार करण्यासाठी नगर विकास विभागाकडून स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राबविण्यांत येत असलेली अन्नत शौचालयाची संकल्पना व त्याबाबतची माहिती त्याचप्रमाणे देखभाल व दुरुस्ती कंत्राट बाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

या अनुषंगाने राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांनी आकांक्षी शौचालयाची वैशिष्टे कळविली असून सदर वैशिष्ट्यांची अंमलबजावणी आपल्या महाविद्यालय व वसतिगृहामध्ये करण्यात यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
**अमरावती.**

[illegible]

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांकः- संकीर्ण -२०२५/प्र.क्र. ८८ (१७३/२५) /समन्वय

दिनांकः- २० ऑगस्ट, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) संचालक, (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय- ओव्हल मैदान तसे महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये क्रिकेट तसेच अन्यच खेळ खेळण्यास येणऱ्या महिला खेळाडुकरीता सुलभ-शौचालयाची उपलब्धता करुन देणेकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत

"ओव्हल मैदान तसे महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये क्रिकेट तसेच अन्यच खेळ खेळण्यास येणऱ्या महिला खेळाडुकरीता सुलभ-शौचालयाची उपलब्धता करुन देणकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत गठीत केलेल्या विशेष चौकशी पथकाच्या दिनांक २० जून, २०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशाबाबत" या विषयावरील नगर विकास विभागाचे क्रमांक संकीर्ण-२०२५/सं.क्र. १०१/नवि-३४, दिनांक १/८/२०२५ चे पत्र आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपली,

(स्वाक्षरी)

(गौरी म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

F:\RUPESH\cr८८-२५२- General Endorsement.docx

# "ओव्हल मैदान तसेच महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये क्रिकेट तसेच अन्य खेळ खेळण्यास येणाऱ्या महिला खेळाडुंकरिता सुलभ शौचालयाची उपलब्धता करून देणेकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत" गठित केलेल्या विशेष चौकशी पथकाच्या दिनांक 20 जून, 2025 ...

सं.क्र. 703 /अ.मु.स./ 1/8/2025

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 1575 दि. 05/08/25

AJIT PALWE <ajit.palwe@nic.in>

Fri 8/1/2025 4:58 PM

Vikas Chandra Rastogi; Dr.Ramaswami N.; Milind mhaiskar; Jayashree Bhoj; RANJIT SINGH DEOL; B.Venugopal Reddy, A.C.S.; Mr. O P Gupta; Saurabh Vijay; Vinita Vaid Singal, Principal Secretary (FCS&CP); Radha Vennelaganti; Dr. I. S. CHAHAL; Dr. P. Anbalagan; Abha Shukla; I.A.Kundan; Mrs. Suvarna Keole; डॉ. किरण कुलकर्णी; Dheeraj Kumar; Ruchesh Jaivanshi, Secretary; SECRETARY OBC DEPARTMENT; Dr. Rajagopal Devara; SEC PHD; Shri.Virendra Singh; MANISHA PATANKAR-MHAISKAR; Sanjay D. Dashpute; Sanjay Dashpute; Rajesh Kumar; Santosh Kumar; Milind Mhaiskar; Shri Eknath Dawale; Dr Harshadeep Kamble; Manisha Verma; TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT; Shri. Atul Patne; GANESH PATIL; Deepak Kapoor, ACS (WRD); Sanjay Khandare; Dr. Anoop Kumar Yadav

D.S (Cord n)

5/8

5/8

श्री. कालीचरन
गोरो
06.08.2025

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.

Email ID : ajit.palwe@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०२५/स क्र १०१/नवि-३४

दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२५.

प्रति,

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालय विभाग) मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई.
३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय : "ओव्हल मैदान तसेच महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये क्रिकेट तसेच अन्य खेळ खेळण्यास येणाऱ्या महिला खेळाडुंकरिता सुलभ-शौचालयाची उपलब्धता करुन देणेकामी तात्काळ उपाययोजना करणेबाबत" गठित केलेल्या विशेष चौकशी पथकाच्या दिनांक २० जून, २०२५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमधील निर्देशाबाबत.

संदर्भ : १. सह सचिव, नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक बीएससी -२४२५/ प्र.क्र.४५७ /नवि-२१, दिनांक ०३.०७. २०२५.
२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) संचालनालय यांचे पत्र क्रमांक जा. क्र. राअस/९१०/२५-२६, दिनांक ०८.०७. २०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत बृहन्मुंबई हद्दीतील ओव्हल मैदान तसेच महाराष्ट्र राज्यातील अशाच प्रकारच्या इतर मैदानांमध्ये क्रिकेट तसेच अन्य खेळ खेळण्यास येणाऱ्या महिला खेळाडुंकरिता सुलभशौचालयाची उपलब्धता करुन देणेकामी तात्काळ उपायोजना करणेबाबत मा. लोक आयुक्त यांनी स्वाधीकारे सुरु केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या विशेष चौकशी पथकाची (STI) बैठक दिनांक २० जून, २०२५ रोजी पार पडली.

२. सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये राज्यातील सर्व मैदान व क्रिडांगणे येथे महिलांकरिता अत्याधुनिक स्वच्छतागृहे तयार करण्यासाठी नगर विकास विभागाकडून स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राबविण्यात येत असलेली उन्नत शौचालये (Aspirational Toilets) ची संकल्पना व त्याबाबतची माहिती त्याचप्रमाणे देखभाल व दुरुस्ती कंत्राट याबाबतचीही माहिती इतर विभागांना उपलब्ध करुन द्यावी. सार्वजनिक शौचालयांची Quality specification सुधारण्यासाठी नगर विकास विभागाने इतर संबंधित विभागांना सूचना देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत .

३. या अनुषंगाने राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांनी आकांक्षी शौचालयाची वैशिष्ट्ये कळविली असून सदर वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत. :-

<u>आकांक्षी शौचालयाची वैशिष्ट्ये</u>

१. सर्व शौचालयाचे सिट्स आणि मुताऱ्या स्वच्छ व वापरण्या योग्य असावेत.
२. बेसिन स्वच्छ असावेत.
३. मुबलक पाण्याची उपलब्धता असावी.
४. शौचालयात व्हेंटिलेशन योग्य असावे. (काचेच्या स्लॅन्टेड खिडक्या, एक्झॉस्ट पंखा)
५. शौचालय परिसरात उजेड असावा, आतून व बाहेरून तसेच प्रत्येक सीटला लाईट असावी.
६. सर्व दरवाज्याचे कडी कोंडे व्यवस्थित असावेत.
७. सेप्टिक टँक मधील मैला हा उघड्यावर टाकला जाऊ नये. तसेच नाल्यात टाकला जाऊ नये.
८. शौचालयाची फरशी नेहमी स्वच्छ आणि कोरडी असावी.
९. शौचालयातील आरसे स्वच्छ असावेत.
१०. प्रत्येक सीट्सला झाकलेली कचरा कुंडी असावी व नियमित स्वच्छ करण्यात यावी.
११. सर्व नळ हे सुस्थितीमध्ये असावेत आणि त्याला गळती नसावी किंवा शौचालाय किंवा बाहेरील बाजूस पाण्याची उपलब्धता असावी. (शौचालय सुरु असलेल्या वेळेत)
१२. शौचालयात साबण/साबण डिस्पेंसर असावेत.
१३. एकाच ब्लॉकमध्ये दोन्ही सुविधा उपलब्ध असल्यास, पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार असावे.
१४. शौचालय प्रवेश/सुलभता (जसे की रॅम्प, पायऱ्या) अडथळामुक्त, ज्यामध्ये विशेषतः दिव्यांग व्यक्तींसाठी प्रवेशद्वार देखील समाविष्ट असावा.
१५. परिसर ये-जा करणाऱ्यांना स्पष्ट फलकांसह दृश्यमान असावा आणि संरचनेच्या प्रत्येक दिशेपासून ३ मीटरच्या आत असलेला परिसर अनधिकृत बांधकाम आणि विक्रेत्यांनी अतिक्रमित केलेला नसावा.
१६. कर्मचाऱ्यांना आवश्यक वस्तू, स्वच्छता उपकरणे, संरक्षक उपकरणे आणि इन्व्हेंटरी पुरविली जावीत.
१७. नियमित स्वच्छता आणि देखभालीसाठी यादी तयार केली जावी आणि शौचालयाच्या उघड्या वेळेत एक काळजीवाहक नेहमीच कर्तव्यावर असवा.
१८. गुगल मॅप्स टॉयलेट लोकेटरवर सार्वजनिक/सामुदायिक शौचालय 'एसबीएम टॉयलेट' म्हणून दर्शविण्यात यावे.
१९. खालील व्यक्तींचे नाव आणि संपर्क तपशील ठळकपणे प्रदर्शित करावेत - पर्यवेक्षक, पर्यवेक्षकांची एजन्सी आणि क्षेत्र स्वच्छता निरीक्षक (संपर्क क्रमांक कार्यरत आहे की नाही ते तपासले जाईल)
२०. तक्रार नोंदणी आणि निवारण यंत्रणा (स्वच्छता ॲप, स्वच्छता हेल्पलाइन १९६९) कार्यरत असावेत आणि नोंदणीनंतर २४ तासांच्या आत सर्व तक्रारी, देखभालीच्या समस्या निराकरण केले जावे.
२१. एअर फ्रेशनर लावण्यात यावे.
२२. भिंती आणि फरशी स्वच्छ आणि डाग / भित्तिचित्रे नसलेल्या असाव्यात.
२३. लहान मुलांसाठी कमी उंचीची शौचालये/ बेसिन असावेत.
२४. शौचालय संकुलाच्या परिसरातील झाडे / झुडुपे चांगली राखली जावीत.
२५. महसूल निर्मितीसाठी जाहिरातींच्या जागा राखीव ठेवण्यात याव्यात.
२६. हँड ड्रायर/पेपर नॅपकिन उपलब्ध करुन द्यावे.
२७. महिलांच्या शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन्ससाठी व्हेंडिंग मशीन असाव्यात.

२८. १० पेक्षा जास्त आसन क्षमता असलेल्या शौचालयांसाठी आणि महिला महाविद्यालय आणि वसतिगृहांलगतच्या शौचालयांसाठी वापरलेले सॅनिटरी नॅपकिन्स विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटर सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

२९. प्रत्येक शौचालय ब्लॉकसाठी शौचालय ओळख क्रमांक, शौचालय कोणत्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट आहे. त्याचे नाव, वॉर्ड क्रमांक आणि देखभाल प्राधिकरण ठळकपणे प्रदर्शित करण्यात यावेत.

३०. शौचालय वापरा संदर्भात एस.एम.एस. वर आधारित अभिप्राय पाठवायचा आहे तो क्रमांक दर्शविण्यात यावा.

३१. शौचालयात आंघोळीची सोय उपलब्ध करुन द्यावी.

(अनिरुध्द व्यं. जेवळीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव : सह सचिव (नवि २१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.